# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 07/08/2023 (सोमवार) सकाळ


---

### जिवानीशी ठार करण्याचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

पो.स्टे. खापा :— अंतर्गत २२ कि. मी अंतरावरील मौजा सोनपुर शिवार येथे दिनांक ०५/०८/२०२३ चे २१.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी नामे— प्रशांत रमेश कुंभरे, वय २५ वर्ष, रा. सोनपुर ता. सावनेर जि. नागपूर यांची आई जखमी नामे— श्रीमती माधुरी रमेश कुंभरे, वय ४२ वर्ष, रा. सोनपूर ता. सावनेर जि. नागपूर आणि लहान भाऊ प्रजित असे घरी हजर होते. रात्री ०८/३० वा. सुमारास लहान भाऊ प्रजित याने आई माधुरी हिला म्हटले की ''तु दारू पिऊन नुस्ती इकडे तिकडे फिरत असते त्यामुळे गावातील मुले मला काहीही बोलत असतात.'' असे म्हणून प्रजित यांने आई सोबत बाचाबाची केली तेव्हा फिर्यादीचा मामा नामे— गणेश धुर्वे आणि मामी संगिता यांनी येऊन त्याला समजाविले त्यानंतर फिर्यादी मामा, मामी यांचे सोबत त्यांचे घरी जेवण करण्यास गेले रात्री ०९/०० वा. सुमारास जेवन करीत असतांना फिर्यादीला त्याचे आईचा जोरात ओरडण्याचा आवाज ऐकु आल्याने फिर्यादी त्याचे मामा नामे — गणेश धुर्वे आणि मामी संगिता असे मिळून फिर्यादीचे घरी गेले असता फिर्यादीचा लहान भाऊ प्रजित हा घराबाहेर येतांना दिसला. घराचे आत गेले असता फिर्यादीची आई माधुरी ही घरातील बैठक खोलीत जखमी अवस्थेत दिसली तिच्या गळयावर धारदार वस्तुने मारल्याचे चिरे दिसत होते व त्यातुन रक्त निघालेले होते तसेच घरातील जमीनीवर फ्लोरींगवर सुध्दा भरपुर रक्त सांडलेले होते तेव्हा आई माधुरी हिने सांगीतले की प्रजित याने **तु दारू पिते आणि नुस्ती फिरत राहते तुला तर आता जिवंत मारूनच टाकतो** असे म्हणून लहान कैचीच्या धारदार पात्याने माझे गळयावर चिरे मारून जखमी केले. फिर्यादी आणि मामी संगिता असे घरा बाहेर आले तेव्हा लहान भाऊ प्रजित यांने घरासमोरील सिमेंट रोडवर स्वत:चे डाव्या हातावर कैचीच्या धारदार पात्याने चिरेमारून स्वत:ला सुध्दा जखमी केले तेव्हा त्यांनी लगेच महिंन्द्रा बोलेरो वाहन बोलावून आई माधुरी आणि भाऊ प्रजित यांना वाहनात टाकुन उपचाराकरीता पीएचसी बडेगाव येथे आणले. तरी दिनांक ०५/०८/२०२३ रोजी रात्री ०९/०० वा. सुमारास लहान भाऊ प्रजित रमेश कुंभरे, वय १९ वर्ष रा. याने फिर्यादीची आई नामे— माधुरी रमेश कुंभरे, वय ४२ वर्ष हिला तु दारू पिते व नुस्ती फिरत राहते तुलेतर आता खतमच करतो असे म्हणून कैचीच्या धारदार पात्याने गळयावर वार करून जिव घेण्याचा प्रयत्न केला तसेच स्वत:च्या डाव्या हाताला वार करून स्वत:ला जखमी केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. खापा येथे आरोपीविरुध्द कलम ३०७ भादवी. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक मनोज खडसे पोस्टे खापा मो. नं. ९४२१०५०३७० हे करीत आहे.

## पळवून नेणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल

**पो.स्टे. नरखेड :–** दिनांक ०२/०८/२०२३ चे ०७:३० वा. ते दिनांक ०६/०८/२०२३ चे ११:०० वा. चे सुमारास पो.स्टे. नरखेड हद्यीत फिर्यादीची मुलगी हि नेहमी प्रमाणे शाळेचा ड्रेस टाकुन क्रांती ज्योतीबा फुले नरखेड येथे शिकते म्हणुन शाळेत गेली त्या दिवशी पाणीच पाणी असल्याने व कामधंदा नसल्याने फिर्यादी हे घरचे सर्वजण घरीच हजर होते. मुलगी ही नेहमी प्रमाणे ०५.०० वा. घरी येते परंतु रात्री ०८.०० वा. तरीपण मुलगी घरी न आल्याने तिचा ईकडे तिकडे गावात शोध घेतला नातेवाईकांमध्ये फोन लावुन विचारपुस केली मिळुन न आल्याने मुलीचा शोध नारायणवार पिपळा उटाकाटा म. प्र. अशा ठिकाणी घेतला असता आजपावेतो मिळुन आली नाही.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. नरखेड येथे आरोपीविरुध्द कलम ३६३ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार डोंगरदीवे पोस्टे. नरखेड मो. नं. ९३०७७२९५२१ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**